| | |
|---|---|
| MHOS070006162026 | **दिवाणी किरकोळ अर्ज क्र. २३७/२०२६.**<br><br>**विष्णु शिवाजी मुगळे**- अर्जदार |

## निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

(दिनांक १६/०७/२०२६ रोजी पारित)

**१.** अर्जदार यांनी सदरचे प्रकरण हे बॉम्बे रेग्युलेशन कायद्यान्वये वारस प्रमाणपत्र (legal heirship certificate) मिळण्यासाठी दाखल केलेले आहे.

**२. अर्जदारांचे थोडक्यात म्हणणे असे आहे की,**

अर्जदार नामे विष्णु शिवाजी मुगळे हा मयत तुळशीराम हाणमा मुगळे यांचा चुलत नातु आहे. अर्जदार हे स्वत: मयताचे वारस क्रमांक १ म्हणून तर अर्जात नमुद वारस २ अनिता शिवाजी मुगळे ही चुलत सुन, वारस क्रमांक ३ महेश शिवाजी मुगळे, वारस क्रमांक ४ नितीन शिवाजी मुगळे ही मयताचे चुलत नातु असून वारस क्रमांक ५ मनिषा सुरज गायकवाड ही मयताची चुलत नात आहे. मयत तुळशीराम हाणमा मुगळे हे मौजे माळगीवाडी, ता. उमरगा, जि. धाराशिव येथील राहत्या घरी दिनांक ०१/०१/१९८७ रोजी अविवाहित मयत झाले आहेत. याशिवाय, मयताचे आई वडील हे ब-याच वर्षापुर्वी मयत झालेले आहेत. मयताचा सख्खा भाऊ संतराम हाणमा उर्फ हणमंता मुगळे हे दिनांक २५/०५/१९९५ रोजी मयत झाले आहेत व मयताचा सख्खा भाऊ शिवाजी संतराम मुगळे हे दिनांक २१/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. मयताचे भाऊ संतराम यांची पत्नी नागराबाई संतराम मुगळे या देखील दिनांक २४/०९/२००८ रोजी मयत झाल्या आहेत. त्यामुळे अर्जदार व अर्जात नमुद वारस हे सर्व उपरोक्त मयत तुळशीराम यांचे कायदेशीर वारस असून त्यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही वारसदार नाही.

**३.** मयत तुळशीराम हाणमा मुगळे यांचे पश्चात उपरोक्त अर्जदार व अर्जात नमुद वारसांव्यतिरिक्त कोणीही वारसदार नाहीत. अर्जदार यांनी मयताचे मृत्यु पश्चात

शासकीय व निमशासकीय कामाकरिता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल करण्यात आलेला आहे.

**४.** अर्ज दाखल झाल्यानंतर, चौकशीचा भाग म्हणून निशाणी क्रमांक १ वर आदेश पारीत करुन जाहिरनामा प्रसिध्द करण्याचा हुकूम केला. त्याअन्वये अर्जदाराने दिनांक ०७/०४/२०२६ रोजी "दैनिक संघर्ष समाजवादाचा" वृत्तपत्रामध्ये जाहिरनामा प्रसिध्द केला. परंतु त्याला प्रतिसाद म्हणून सदर प्रकरणात कोणीही हजर होऊन आक्षेप घेतला नाही.

**५.** अर्जदार याने त्याची मागणी सिध्द करण्याकरिता स्वतःला निशाणी क्रमांक १० वर तपासले. अर्जदार यांनी त्यांच्या लेखी पुराव्या व्यतिरिक्त काही कागदोपत्री पुरावा अभिलेखावर आणले आहे. अर्जदार यांनी मयत तुळशीराम हाणमा मुगळे यांचे मृत्यू प्रमाणपत्र निशाणी क्रमांक १२, नागराबाई संतराम कदम यांचे मृत्युप्रमाणपत्र निशाणी क्रमांक १३, शिवाजी संतराम मुगळे यांचे मृत्युप्रमाणपत्र निशाणी क्रमांक १४, वारसाचे स्वयंघोषणापत्र निशाणी क्रमांक १५ तसेच अर्जदार व अर्जात नमुद इतर वारस यांचे आधारकार्डची साक्षांकीत प्रत अनुक्रमे निशाणी क्रमांक १६ ते २० कडे दाखल केलेली आहे. याशिवाय मयत संतराम हाणमा मुगळे यांच्या मृत्यू नोंदीची अनुउपलब्धता नसल्याचे ग्रामपंचायत कार्यालय मळगीवाडी यांचे प्रमाणपत्र, पंचनामा, ग्रामसेवक व पोलीस पाटील यांचा अभिप्राय दाखल केला आहे. अर्जदार यांचे तर्फे त्यांचे वकील यांनी निशाणी क्रमांक २२ वर पुरसिस दाखल करुन त्यांचा पुरावा बंद केल्याचे घोषित केले. "दैनिक संघर्ष समाजवादाचा" वृत्तपत्रात जाहिरनामा निशाणी क्रमांक २१ कडे दाखल केले आहे.

**६.** प्रस्तुत प्रकरणाचे बारकाईने अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, अर्जदाराच्या प्रस्तुत अर्जाला व पुराव्याला कोणीही हजर होऊन विरोध केला नाही. त्यामुळे अर्जदारांच्या अर्जातील नमुद हकीकत, तसेच त्यांचा तोंडी व कागदोपत्री पुरावा पाहता असे स्पष्ट होते की, मयत तुळशीराम हाणमा मुगळे यांचे अर्जदार व अर्जात नमुद

वारस हे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार व अर्जात नमुद वारस यांना त्यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यास काहीही अडथळा वाटत नाही. परिणामी, मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येत आहे. |
| २. | अर्जदार नामे विष्णु शिवाजी मुगळे व अर्जात नमुद इतर वारस नामे अनिता शिवाजी मुगळे, महेश शिवाजी मुगळे, नितीन शिवाजी मुगळे व मनिषा सुरज गायकवाड हे मयत तुळशीराम हाणमा मुगळे यांचे कायदेशीर वारस असल्याचे वारस प्रमाणपत्र त्यांना देण्यात यावे. |

Digitally signed by KAPIL NIVRATTI NIVDANGE
Date: 2026.07.16 16:31:54 +0530

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

( के. एन. निवडंगे )
सह दिवाणी न्यायाधिश क. स्तर
उमरगा.

उमरगा
दिनांक १६/०७/२०२६

प्रमाणपत्र

प्रमाणीत करण्यात येते की, सदर न्यायनिर्णयाच्या पी.डी.एफ. फाईल मधील मजकूर मूळ न्यायनिर्णयातील मजकूराप्रमाणे सारखा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | -- | सुरेश बापु भिंगारे |
| न्यायालय व पिठासीन अधिकारी | -- | श्री. के. एन. निवडंगे,<br>सह. दिवाणी न्यायाधीश क.स्तर,उमरगा. |
| दिनांक | -- | १६/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | -- | १६/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयाची प्रत सी. आय. एस. प्रणालीमध्ये नोंदवलेला दिनांक | -- | १६/०७/२०२६ |

.